आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र – रात्री ८ वा ५ मि.

५ ऑक्टोबर २०२३ – गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यातल्या सर्व जिल्ह्यातल्या शासकीय रुग्णालयांचा अहवाल तातडीनं सादर करण्याचे मुख्यमंत्र्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना आदेश
- सिक्कीममध्ये आलेल्या महापुरात आतापर्यंत १८ जणांचा मृत्यू, २६ जण जखमी
- यंदाचा साहित्याचा नोबेल पुरस्कार नॉर्वेतले थोर साहित्यिक-नाटककार जॉन फोस यांना जाहीर
- एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेला आजपासून सुरुवात

आणि

- आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला आज तीन सुवर्ण, एक रौप्य आणि एक कांस्य पदक

**<><><><><>**

राज्यातल्या सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी शासकीय रुग्णालयांना तात्काळ भेटी द्याव्यात, आणि जिल्ह्यातल्या सद्यस्थितीचा अहवाल तातडीनं सादर करावा, असे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. त्यांनी आज सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी दूरदृश्यप्रणालीद्वारे संवाद साधून राज्यातल्या आरोग्य सुविधांचा आढावा घेतला.

नांदेड आणि घाटी इथल्या रुग्णालयांमध्ये झालेल्या मृत्यू प्रकरणाच्या चौकशीसाठी राज्यस्तरीय समिती नेमली असून दोषींवर कडक कारवाई केली जाईल, असा इशाराही शिंदे यांनी यावेळी दिला. औषध खरेदीचे अधिकार

जिल्हाधिकाऱ्यांनाही दिले आहेत. त्यामुळे औषध खरेदीत विलंब होणार नाही, याची दक्षता घ्यावी, यापुढं जिल्हाधिकाऱ्यांनी नियमितपणे शासकीय रुग्णालयांना भेटी द्याव्यात, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

आरोग्य व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी अल्पकालीन आणि दीर्घकालीन आराखडा तयार करण्याचे काम राज्य सरकार करत असून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

**<><><><><>**

राज्यातल्या या घटनांची स्वतःहून दखल घेत राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानं राज्य शासनाच्या मुख्य सचिवांना नोटीस बजावली आहे. चार आठवड्यांत या प्रकरणाचा सविस्तर अहवाल द्यावा, असं त्यात म्हटलं आहे.

**<><><><><>**

मध्य प्रदेशातल्या जबलपूरमध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज १२ हजार ६०० कोटी रुपयांहून अधिक विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन केलं. त्यांनी वीरांगना राणी दुर्गावती स्मारकाचं भूमिपूजनही तसंच राणी दुर्गावती यांच्या स्मरणार्थ टपाल तिकीटही जारी केलं.

भारतातल्या महापुरुषांना आणि आदिवासी समाजाला आदर द्यायला पूर्वीची सरकारे विसरली होती. माजी प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयी यांनी सर्वप्रथम आदिवासी मंत्रालयाची निर्मिती करून आदिवासी समाजाला सन्मान मिळवून दिला, असं यावेळी प्रधानमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

देशाची सांस्कृतिक विविधता ही, देशभरातल्या महान संतांच्या शिकवणीच्या समान धाग्यानं जोडलेली असल्यानं, "एक भारत श्रेष्ठ भारत" या संकल्पनेला बळ

मिळतं, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. 'वल्लार' या नावानं परिचित असलेल्या श्रीरामलिंग स्वामी यांच्या दोनशेव्या जयंतीनिमित्त प्रधानमंत्री व्हिडिओ माध्यमातून आज बोलत होते.

**<><><><><>**

सिक्कीम मध्ये ढगफुटीमुळे आलेल्या पुरात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या १८ वर पोहोचली असून, २६ जण जखमी झाले आहेत आणि लष्करी जवानांसह ९८ जण बेपत्ता आहेत. यामध्ये बीडमधल्या पांडुरंग तावरे यांचाही समावेश आहे. लाचेन आणि लाचुंग भागात फिरायला गेलेले पर्यटक सुरक्षित असल्याची माहिती सिक्कीमचे मुख्य सचिव व्ही बी पाठक यांनी दिली आहे. लष्कराच्या त्रिशक्ती कॉर्प्सचं दल उत्तर सिक्कीममधल्या चुंगथांग, लाचुंग आणि लाचेन या भागात अडकलेल्या नागरिकांना आणि पर्यटकांना वैद्यकीय मदत आणि टेलिफोन संपर्क पुरवत आहेत.

सिक्कीममध्ये आलेल्या पुरापाठोपाठ पश्चिम बंगालच्या उत्तर भागातली भागातली पूरस्थिती गंभीर होऊ लागली आहे. दार्जिलिंग आणि कालिम्पॉंगच्या डोंगराळ भागात आणि तराई आणि डुअर्स या पठारी प्रदेशाच्या जलपाईगुडी आणि अलीपुरद्वार या भागाला पुराचा सर्वात जास्त तडाखा बसला आहे. दार्जिलिंग आणि कालिम्पॉंग जिल्ह्यांमधल्या अनेक भागांचा संपर्क तुटला आहे. बचाव पथकानं या भागातून आतापर्यंत सुमारे ५ हजार नागरिकांची सुटका केली आहे.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसमधल्या फुटीसंदर्भात उद्या दुपारी केंद्रीय निवडणूक आयोगासमोर सुनावणी होणार आहे. अजित पवार गटाने निवडणूक आयोगाकडे पक्षाचे निवडणूक चिन्ह मिळावे आणि अधिकृत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणून

मान्यता मिळावी, यासाठी अर्ज केला आहे. या दाव्याला शरद पवारांसोबत असलेल्या गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी विरोध केला आहे.

**<><><><><>**

हवामान क्षेत्रातल्या अत्याधुनिक संशोधनाचा आणि त्याद्वारे मिळणाऱ्या अचूक अंदाजाचा फायदा देशातले शेतकरी आणि मच्छीमारांना होत आहे. गेल्या ९ वर्षात या क्षेत्रात भारतानं अधिक दमदार कामगिरी केली आहे असं केंद्रीय पृथ्वी विज्ञान मंत्री कीरेन रीजीजू यांनी म्हटलं आहे. ते आज महाबळेश्वर मधल्या अती उंचावरच्या मेघ भौतिकशास्त्र प्रयोगशाळेला भेट देऊन त्याची पाहणी केल्यानंतर वार्ताहरांशी बोलत होते. हवामानाच्या अचूक अंदाजा बरोबरच समुद्रात कुठे आणि कधी कोणत्या जातीचे मासे अधिक प्रमाणात मिळतील याचाही अचूक अंदाज हवामान विभाग वर्तवू लागला आहे, त्यामुळे त्याचा फायदा मच्छीमारांना होत असल्याचं रीजीजु म्हणाले.

**<><><><><>**

मध्य प्रदेश सरकारनं, वनविभाग वगळता इतर खात्यांमधल्या कर्मचारी भर्तीमध्ये महिलांना ३५ टक्के आरक्षण देण्याची अधिसूचना जारी केली आहे. मध्य प्रदेश नागरी सेवा नियमात सुधारणा करून हे आरक्षण दिलं आहे. कोणत्याही सेवा नियमांमध्ये काहीही म्हटलं असलं तरी, राज्याच्या सर्व पदांपैकी ३५ टक्के पदं, थेट भरतीच्या टप्प्यावर महिलांसाठी राखीव असतील, असं या अधिसूचनेत नमूद केलं आहे.

**<><><><><>**

कृत्रिम बुद्धीमत्तेच्या मदतीनं निवडणुकीपूर्वी तेलंगणातल्या ऑनलाइन व्यवहारांवर लक्ष ठेवण्यासाठी रिझर्व बँक आणि राज्यस्तरीय बँकर्स समित्यांना

सांगण्यात आलं आहे, असं मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी म्हटलं आहे. राज्यातल्या निवडणुकीच्या तयारीच्या आढाव्यानंतर ते आज हैदराबादमध्ये माध्यमांशी बोलत होते. विशेषत: राज्य सीमेवरील चेकपोस्टवर रोख आणि प्रकारची अवैध वाहतूक रोखण्यासाठी  राज्य अधिकाऱ्यांना त्यांनी कडक कारवाई करण्याचे निर्देश दिले.

**<><><><><>**

साहित्यक्षेत्रातला नोबेल पुरस्कार यंदा नॉर्वेतले थोर साहित्यिक- नाटककार जॉन फोस यांना जाहीर झाला आहे. मूक भावना व्यक्त करणाऱ्या त्यांच्या लिखाणाबद्दल त्यांची निवड पुरस्कार समितीने केली आहे. हेन्रिक इब्सेनच्या खालोखाल जॉन फोस यांच्या नाटकांचे प्रयोग रंगमंचावर झाले आहेत. दैनंदिन व्यवहारातल्या प्रसंगांमधून मानवी भावनांचं सशक्त चित्रण  त्यांच्या लेखनात असतं असं नोबेल पुरस्कार समितीने म्हटलं आहे.

**<><><><><>**

एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेला आजपासून सुरुवात झाली. अहमदाबादमध्ये सुरू असलेल्या पहिल्या सामन्यात न्यूझीलंड विजयाकडे वाटचाल करतो आहे.

न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण स्वीकारलं. प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडनं ९ बाद २८२ धावा केल्या. शेवटची बातमी हाती आली, तेव्हा न्युझिलंडच्या ३१ षटकात १ बाद २१८ धावा झाल्या होत्या.

देवन कॉनवे आणि रजिन रविंद्र या दोघांनीही नाबाद शतकं केली आहेत.

**<><><><><>**

चीनमधे हांगझोऊ इथं सुरु असलेल्या आशियाई क्रिडा स्पर्धेत भारतानं आतापर्यंत ८६ पदकांची कमाई केली आहे. त्यात २१ सुवर्ण, ३२ रौप्य आणि ३२

कांस्य पदकांचा समावेश आहे. पदकतालिकेत भारत चौथ्या स्थानावर कायम आहे. स्पर्धेच्या १२ व्या दिवशी आज भारतानं तीन सुवर्ण, एक रौप्य आणि एका कांस्य पदकाची कमाई केली.

तिरंदाजीत कंपाउंड प्रकारात भारतीय संघानं दक्षिण कोरियावर मात करत सुवर्ण पदक पटकावलं. त्याआधी याच प्रकारात भारतीय महिला संघानं चीनी तैपेईला हरवत सुवर्णपदक मिळवलं. स्क्वॉशमधे मिश्र दुहेरीत भारताच्या दीपिका पल्लीकल आणि हरिंदर पाल सिंग सिंधू या जोडीनं मलेशयाच्या जोडीला पराभव करत सुवर्णपदकाला गवसणी घातली.

**<><><><><>**

कर्नाटकातल्या दुष्काळग्रस्त भागाला ४ हजार ८६० कोटी रुपयांची मदत करावी अशी मागणी कर्नाटक सरकारनं केली आहे. केंद्रीय पातळीवरची आंतरमंत्रालयीन समिती कर्नाटकातल्या १९५ तालुक्यांना ४ दिवसीय दौऱ्यात भेट देणार आहे.

**//<><><><><>//**